
ISSN. 2229-40[illegible]

Abhisaran

VOL. XV SPECIAL ISSUE APRIL 2016

# RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS



PART IV

*Editors*

**Dr. Vasant Sanap**

**Mr. Shailesh Akulwar**

ISSN: 2229-4856

# ABHISARAN

VOL. XV SPECIAL ISSUE APRIL 2016

Half Yearly Journal

One Day Interdisciplinary International Conference On

## Relevance Of Gandhian Thoughts

(7th April, 2016)

PART- 4

*Chief Editor*

**Dr. Vasant Sanap**

Principal, Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

*Editor*

**Mr. Shailesh Akulwar**

Co-ordinator, Gandhian Study Centre

Head, Dept. of Public Administration

Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

*Co-editor*

**Dr. Ravindra Kale**

Head, Dept. of Political Science

Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

M.S.P. MANDAL'S

BALBHIM ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE, BEED-431 122

NAAC Reaccredited 'A' Grade College with Potential for Excellence

*Chief Editor:* Dr. Vasant Sanap
*Editor:* Mr. Shailesh Akulwar
*Co-editors:* Dr. Ravindra Kale
Dr. Mahadeo Sakhare
Mr. Bhagorao Tate
Dr. Sunita Bhosle

**REGULAR EDITORIAL BOARD**

*Chief Editor:* Dr. Vasant Sanap
*Managing Editor:* Dr. Bharat Sonwane
*Editor:* Dr. Vidyasagar Patangankar
*Executive Editor:* Dr. Babasaheb Kokate
*Associate Editor:* Dr. Pramila Jadhav
*Members:* Mr. Shailesh Akulwar, Mr. Abdulkadar Maniyar, Dr. Ravindra Kale, Dr. Rajendra Chauhan, Dr. Ganesh Mohite

© Principal, Balbhim Arts, Science & Commerce College, Beed-431 122

**Type-setting**
Seema Gangarde, Parbhani

***Cover Designing***
Dr. Kalyan Gangarde, Parbhani

***Printed by***
Dr. Kalyan Gangarde,
New Man Publication
108, Brahma Apartments,
Nr. Dattadham, Parbhani - 431401
Email: nmpublication@gmail.com
www.newmanpublication.com
Mob. 91 9420079975, +91 9730721393

**Subscription Rates:**

| | |
|---|---|
| Annual membership (Individual) | Rs. 500/- |
| Institutional annual membership | Rs. 1,000/- |
| Life membership (Individual) | Rs. 4,000/- |
| Life membership (Institutional) | Rs. 5,000/- |

**Published twice in a year in January and July**

**DISCLAIMER:** Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.

# 37.

# महात्मा गांधीचे रामराज्य (ग्रामराज्य) विषयक विचार

**प्रा.शेळके गणेश शेषराव** **प्रा.गोरे नारायण सुभाषराव**

न्यू आर्टस् कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव जि.अहमदनगर

**प्रास्ताविक :-** आपल्या देशात सामाजिक व राजकीय संदर्भात स्वातंत्र्य लढ्याच्या विशिष्ट अवस्थेत महात्मा गांधीचा भारतीय राजकारणात उदय झाला. म.गांधीनी गांधीवाद असा एखादा वाद नाही असे म्हटले असले तरी त्यांच्या विस्तृत आणि विषयांवरच्या लिखानातून मांडलेले विचार हेच गांधीवाद ठरतात. गांधीनी नितीवादी राजकारणी होते. सत्य अहिंसा ही मूल्य मानून त्या आधारे मानवी समाजाचा विकास व्हावा असे मत त्यांनी मांडले. गांधीच्या अगोदर आधुनिक भारतीय विचारवंतानी त्यांच्या इतका सर्वस्पर्शी विचार मांडला नव्हता. धर्म, निती, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण आरोग्य, कायदा शेती कोणतेही क्षेत्र असो. वैयक्तीक आत्मशांतीपासून विश्वशांतीपर्यंत, गावापासून विश्वापर्यंत प्रचंड विस्तारीत व सर्वस्पर्शी गांधी विचार आहेत.

महात्मा गांधी धार्मिक प्रवृत्तीचे नितीवादी सुधारक व स्वातंत्र्यवादी होते त्यांच्या विचारांचे मुळ धार्मिक तत्वात होते. ग्रामीण भागाच्या विकासा संदर्भात राजराज्य हा त्यांचा आदर्श होता. भारतातील प्राचीन समाजरचनेवर त्यांचा विश्वास होता. “पंच हाच परमेश्वर” मानना-या ग्रामपंचायती, स्वावलंबी, सुसंस्तृ व ग्रामीण जीवन, ग्रामोद्योग यावर त्यांचा विश्वास होता चातुवर्ण्यावरही त्यांचा विश्वास होता. पण अस्पृश्यतेचा कलंक धुउन काढण्यासाठी त्यांनी अविरत परिश्रम केले. महात्मा गांधीचा रामावर विश्वास होता त्यांच्या राज्यासारखेच राज्य स्थापन करण्याच्या कल्पनेतून महात्मा गांधीनी रामराज्याची संकल्पना मांडली.

**रामराज्य (ग्रामराज्य) :-** महात्मा गांधीनी राज्यसंस्थेस विरोध केला व आदर्श राज्याची कल्पना मांडली त्यांचे आदर्श राज्य हे खेड्यांची आत्मनिर्भता असणारे ग्रामराज्य आहे. त्यांनी आपल्या विचारात शहरी सभ्यतेला विरोध करुन ग्रामीण सभ्यतेवर भर दिला. त्यासाठी त्यांनी भारतातील खेड्यांचा विकास आवश्यक मानून “खेड्याकडे चला” असा संदेश दिला. या संकल्पना त्यांनी आत्मनिर्भयतेवर जास्त भर दिला आहे. केवळ राजकीय सत्तादानामुळे समाजपरीवर्तन होणार नाही. त्यासाठी नैतीक व सामाजीक परिवर्तन झाले पाहिजे असा महात्मा गांधीजींच्या आग्रह होता. हक्कांपेक्षा कर्तव्याला ते जास्त महत्त्व देत रामराज्यात हिंसा मद्यपान, जुगार, वर्गद्वेष अनैतीकता राहणार नाही असे विचार महात्मा गांधीनी मांडला आहे.

या आदर्श राज्यापर्यंत जाणारा सर्वांत निकटचा मार्ग गांधीच्या मते विकेंद्रिकरण हा आहे. प्रत्येक खेडे हा या नव रचनेचा केंद्रबिंदू राहणार आहे. कारण त्यांच्यामते "भारताचे दर्शन मुठभर शहरामध्ये घडते. केंद्रबिंदू असलेल्या खेड्यांच्या केंद्रस्थानी व्यक्ती असेल. राज्याची रचना पिरमीडसारखी नव्हे. तर सागरी वर्तुळाप्रमाणे राहील. स्वायत्त खेडी स्वयंस्फूर्त सहकाराच्या बळावर आपापल्या गरजा भागवू शकतील आणि सर्वांना प्रतीष्ठापूर्ण व शांततामय सहजीवन शक्य करु शकतील अहिंसात्मक सभ्यतेकडे पोहचण्याचा लघूत्तम मार्ग म्हणजे ग्रामीण विकास हाच आहे याविषयी गांधीजींना खात्री होती मात्र खेड्यांची स्वायत्तता म्हणजे एकाकीपणा नव्हे, असे मत गांधीजी मांडतात.

गांधीजीच्या स्वराज्याचा मध्यबिंदू शहरी मध्यमवर्गीय नसून ग्रामीण शेतकरी व शेतमजूर आहेत. इंग्रज राजवटीत भारतातील ग्रामीण जीवन पुर्णपणे विस्कळीत झाले होते. खेड्यातील स्वयंपूर्णता नष्ट झाली होती व तीच्या पूर्नस्थापनेसाठी पुन्हा ग्रामराज्य निर्माण होणे. आवश्यक होते. ग्रामीण, अर्थव्यवस्था पुर्णपणे मोडून गेली होती. त्यावेळी गांधीजींनी घोषणा दिली ती म्हणजे खेड्याकडे चला याच्याच आधारावर नंतर त्यांनी रामराज्य संकल्पना स्पष्ट केली या आदर्श राज्यालाच ग्रामराज्य असेही म्हणतात. त्याविषयी पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण गांधीनी दिले आहेत.

१) रामराज्य हा स्वराज्याचा आदर्श आहे त्याचा अर्थ धर्मांच राज्य किंवा न्यायाच आणि प्रेमाचं राज्य किंवा जनतेचे स्वराज्य होय.
२) लोकांच स्वराज्य म्हणजे प्रत्येक व्यक्तींच्या स्वराज्यातून उत्पन्न झालेल प्रजासत्ताक राज्य अशा तऱ्हेचे राज्य हे फक्त प्रत्येक व्यक्तींन नागरीक या नात्यानं केलेल्या आपल्या धर्मांच्या पालनातून उत्पन्न होतं.
३) ग्रामराज्यात जो सेवाधर्म पाळतो त्यालाच नागरीकत्वाचे खरे हक्क दिले पाहीजेत.
४) रामराज्यात एका बाजूला संपन्नता व दुसऱ्या बाजूला करुणाजनक भूंककंगाली जनता असणार नाही या राज्यात कोणी भुकेन मरणार नाही हे राज्य पाशवी बळावर आधारीत नसेल.
५) रामराज्यात शेतीच्या विकास मोठ्या प्रमाणावर झालेला असेल व ग्रामीण जीवन स्वयंपुर्ण होईल.
६) रामराज्यात सर्व धर्म, सर्व वर्ण आणि सर्व वर्ग समान भावानं खेळीमेळीने राहत असतील आणि धार्मीक वादाचा नवलेशाही राहणार नाही.
७) रामराज्य हे कोट्यावधी लोकांचे आणि कोट्यावधीच्या सुखासाठी चाललेलं राज्य असेल या राज्यात राजा, अध्यक्ष, पंतप्रधान असे कोणीही प्रमुख असो तो प्रजेचा सेवक असेल.

८) रामराज्यात स्त्री व पुरुष समान असतील.

९) रामराज्यात आंतरराष्ट्रीय क्षेत्रात युध्द नसेल तर परस्पर सामजस्य व शांततामय सहजीवनाचे ध्येय असेल त्यामुळे लष्करी खर्च अत्यल्प असेल.

१०) रामराज्य हा एकाच देशाकरीता किंवा लोकांकरीता उत्तम आदर्श नाही तर सर्व जगासाठी आदर्श आहे.

**महात्मा गांधीच्या ग्रामस्वराज्य महत्त्वाचे घटक :-**

**अहिंसात्मक समाज :-** गांधीजींच्या ग्रामराज्यात सर्वत्र अंहिसा या तत्त्वाचे पालन केले जाईल ग्रामराज्यात कुठेही बलप्रयोग केला जाणार नाही. सर्व विकासात्मक यंत्रणांचा उपयोग शोषनासाठी नव्हे तर जनतेच्या सेवेसाठी केला जाईल तसेच समाजाविरोधी तत्त्वांचे उच्चाटण करण्यासाठी अहिंसात्मक मार्गाचा वापर केला जाईल.

**विकेंद्रीकरण:-** गांधीजींनी आपल्या ग्रामराज्याच्या संकल्पनेत सत्तेच्या विकेंद्रीकरणावर मोठ्या प्रमाणावर भर दिला आहे. त्यांना आर्थिक, सामाजिक, राजकीय अशा सर्वंच पातळीवर विकेंदीकरण आवश्यक वाटत होते. त्यामुळेच त्यांनी सत्तेचे विकेंद्रीकरण खेड्याकडे करावे असे सुचवलेल आहे. तसेच त्यांनी आर्थिक विकेंद्रीकरणासाठी कुटीवर उद्योग व स्वयंरोजगाराला महत्त्व देतात.

**वर्णव्यवस्था :-** महात्मा गांधी आपल्या ग्रामराज्यात चतुवर्ण व्यवस्था सुचवितात यामध्ये ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य व शुद्र हे चार वर्ण असतील. प्रत्येक व्यक्तीचा वर्ण जातीवर न ठरता त्याच्या कर्मावर ठरेल. असे प्रतीपादन त्यांनी केले आहे. वर्णव्यवस्था असली तरी वर्णावर आधारीत भेदभाव केला जाणार नाही याची ग्वाही गांधीजी देतात.

**खासगी संपत्ती :-** गांधीजी आपल्या ग्रामराज्यात खाजगी मालमत्तेला संमती देतात. मात्र खाजगी संपत्तीचा विनीयोग मात्र समाजसेवेसाठी केला जाई व त्या संपत्तीचा मालक तीचा विश्वस्त म्हणून कार्य पाहील. श्रीमंत नागरीक आपल्या अतीरिक्त संपत्तीतून समाजउपयोगी हॉस्पीटल, विविध उपक्रम, नवीन रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी करावा असे सुचवितात.

**धर्मनिरपेक्षता :-** अस्पृश्यतेप्रमाणेच धार्मिक भेदभावास देखील गांधीजी विरोध करत असत. त्यामुळे त्यांनी ग्रामराज्यात धर्मनिरपेक्षतेस महत्त्व दिले आहे. राज्याच्या दृष्टीने सर्व धर्म समान असतील कोणत्याही धर्माला राजाश्रय दिला जाणार नाही.

**निष्कर्ष :-**

१. रामराज्यातून ग्रामीण स्वायत्तता निर्माण होऊ शकते.

२. गांधीजीच्या स्वराज्यासाठी केंद्रबिंदू शहरी मध्यमवर्गीय नसून ग्रामीण शेतकरी व शेतमजूर आहे.

३. शहराच्या विकासापेक्षा ग्रामविकास महत्त्वाचा आहे.

गांधीजीच्या रामराज्य या संकल्पनेचे वरील प्रमाणेच थोडक्यात विवेचन केले आहे. गांधीना राष्ट्रपीता म्हटले जाते व त्याचे राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनातील नेतृत्व लक्षात घेतले असता ती अतीशयोक्ती ठरणार नाही. त्यांनी मांडलेली रामराज्याची संकल्पना जरीही आदर्शवादी वाटत असली तरीही आजच्या २१ व्या शतकातही ही संकल्पना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या दुष्काळ, वाढलेला भ्रष्टाचार अशा परीस्थितीत त्यांच्या रामराज्याचे महत्त्व वाढते व ग्रामीण भागाच्या विकासासाठी ही संकल्पना आवश्यक ठरते.

महात्मा गांधीनी रामराज्यात सुचवलेले कुटीरउद्योगांचा विकास न होता आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. प्रौढ शिक्षणाकडे कुणाचेही लक्ष नाही. ग्रामसुधारणाच्या केवळ घोषणा केल्या जातात. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र दिसून येत नाही. गांधीजींच्या रामराज्यातील संकल्पने प्रमाणे 'सत्यमेव जयते' याचा उद्घोष सर्वत्र केला जातो. पाट्या लावल्या जातात मात्र सर्वत्र असत्यमेव जयतेचा नारा आढळतो. आजही ग्रामीण भागातील विकासासाठी ही संकल्पना उपयोगी ठरु शकते.

**संदर्भ :**


१) डोळे ना.य. राजकीय विचाराचा इतिहास. कॉन्टी नेन्टल प्रकाशन, पुणे-३०, प्रथम आवृत्ती- डिसेंवर १९६९.

२) काळे शैलजा, सत्याचे पुजारी गांधीजी, ज्ञानेश प्रकाश, नागपुर-४४००२२.

३) विलास सदाफळ, विठ्ठलराव कापडी, राजकीय विचारप्रणाली, सक्सेस पब्लीकेशन, पुणे-३०

४) गांधी M.K. आत्मकथान नवजीवन, प्रकाशन मंदीर अहमदाबाद-१४.

५) ताटके अरविंद, महात्मा गांधी सरिता प्रकाशन, सेनापती बापट मार्ग, पुणे-१६.

६) भोळे भा.ल. आधुनिक भारतातील राजकीय विचार प्रणाली, पिंपळापूर ॲन्ड प्रकाशन, नागपुर.


❑❑❑